नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १०/११/२०२५ (सोमवार )**

---

## दगडी कोळश्याची चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूध्द १० गुन्हे नोंद
## १५ मोटर सायकल आणि १० सायकल अशी एकुण २५ वाहने जप्त,
## २ लाख ४९ हजार ७५० रूपयांचा मुद्देमाल जप्त
## पोलीस स्टेशन कन्हान आणि मौदा यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हान** :– दिनांक १०/११/२०२५ रोजी कन्हान पोलीसांना पेट्रोलीग दरम्यान पोलीस स्टेशन कन्हान समोर जबलपुर – नागपुर महामार्ग क्रमांक ४४ वर पोलीसांनी दगडी कोळसा चोरी करून नेणाऱ्या आरोपीतांना पकडले. **कारवाई क्रं १.** आरोपी नामे १) धनपत सैदल कश्यप वय ४५ वर्ष २) बडका चौकीदार कश्यप, वय ५५ वर्ष ३) चुन्नू रामखीलावान कश्यप वय ५० वर्ष ४) संतराम महादेव कश्यप वय ४२ वर्ष ५) रामबाबू श्रीपाल कश्यप वय ५५ वर्ष सर्व रा. खदान नं. ६ कन्हान या आरोपीतांच्या ताब्यातुन १) प्रत्येकी १ अशा ५ सायकल किंमती ५,०००/– रूपये आणि २) ५ सायकल वरील एकुण २०० किलोग्रॅम कोळसा किंमती १०,००/–रूपये असा एकुण ६,०००/–रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. **कारवाई क्रं २** आरोपी नामे १) बडेलाल कल्लू कश्यप वय ४२ वर्ष २) बच्छराज श्रीपाल कश्यप वय ३५ वर्ष ३) मनोज भोला कश्यप वय ४० वर्ष ४) छोटेलाल कल्लू कश्यप, वय ४५ वर्ष ५) छोटा जागरूप कश्यप वय ५० वर्ष सर्व रा. खदान न. ६ कन्हान यांचे ताब्यातुन १) प्रत्येकी १ अशा ५ सायकल किंमती ५,०००/– रूपये आणि २) २१० किलो कोळसा किंमती १०,५०/–रूपये असा एकुण ६,०५०/– रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. **कारवाई क्रं ३** आरोपी नामे १) धनराज बाळकृष्ण गजभिये वय ४१ वर्ष रा. धर्मनगर कन्हान २) आकाश अरविंद जगणे वय २४ वर्ष रा. टेकाडी कन्हान यांचे ताब्यातुन २

मोटर सायकल आणि २५० किलो दगडी कोळसा असा एकुण किंमती २६,५००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. **कारवाई क्रं ४** आरोपी नामे १)शुभम मुन्नाशींग गैरवार वय ३२ वर्ष रा. खदान न. ६ कन्हान २) अशोक केशराव शेंद्रे वय ३३ वर्ष रा. टेकाडी यांचे ताब्यातुन २ मोटर सायकल आणि ४०० किलो दगडी कोळसा असा एकुण किंमती २४,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला. **कारवाई क्रं ५** आरोपी १) ओमप्रकाश द्वारका कश्यप वय ३८ वर्ष रा. खदान नं ६ कन्हान २) प्रभात अजयदास सोनवणे वय २१ वर्ष रा. शिवनगर कांद्री यांचे ताब्यातुन १ मोटर सायकल आणि १ मोपेड वाहनावरील २९० किलो दगडी कोळसा असा एकुण किंमती ३१,४५०/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला.**कारवाई क्रं ६** आरोपी १) शैलेंद्र मिलींद गोटेफोडे, वय ३० वर्ष रा. रॉयनगर, कन्हान आणि २) फजित अजाबराव चवरे, वय ५० वर्ष रा. विवेकानंद नगर,कन्हान यांचे ताब्यातुन २ मोटर सायकल आणि २८० किलो दगडी कोळसा असा एकुण किंमती २९,४००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला. **कारवाई क्रं ७** आरोपी क्रं १) अभिषेक भाऊराव भोयर वय २३ वर्ष रा. पिपरी कन्हान आणि २) मुरलीधर गोपीचंद वाघधरे वय ३५ वर्ष रा. जुनी कामठी कन्हानयांचे ताब्यातुन २ मोटर सायकल आणि ७०० किलो दगडी कोळसा असा एकुण किंमती २५,५००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला. **कारवाई क्रं ८** आरोपी क्रं १) अर्जुन दिनकर मडावी वय ३० वर्ष रा. रायनगर कन्हान २) अक्षय जयराम कोरवते वय ३० वर्ष रा. पिपरी कन्हान यांचे ताब्यातुन २ मोटर सायकल आणि ४५० किलो दगडी कोळसा असा एकुण किंमती २८,२५०/— **रूपया**ंचा मुददेमाल जप्त केला. **कारवाई क्रं ९** आरोपी क्रं १) नितेश राजू सहारे, वय ३१ वर्ष रा. कांद्री २) शाहनवाज इस्रायल खान वय ३१ वर्ष रा. रायनगर कन्हानयांचे ताब्यातुन २ मोटर सायकल आणि ३०० किलो दगडी कोळसा असा एकुण किंमती २६,५००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला.

**पोलीस स्टेशन मौदा** :— पोलीस स्टेशन मौदा अंतर्गत आरोपी नामे १) अनिल जगदिश कश्यप, वय २० वर्ष, रा. खदान न. ६ ता पारशिवणी याचे ताब्यातुन १ मोटर सायकल आणि २२० किलो दगडी कोळसा असा एकुण किंमती ४६,१००/— **रूपया**ंचा मुददेमाल जप्त केला.

सदर कारवाईत एकुण १५ मोटर सायकल आणि १० सायकलवरील ३,३०० किलो दगडी कोळशा असा एकुण २,४९,७५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी २५ आरोपीतांविरूध्द पोस्टे कन्हान कोळसा चोरीचे ९ गुन्हे तसेच पोलीस स्टेशन मौदा येथे १ गुन्हा असे एकुण १० गुन्हे नोंद करण्यात आले आहे.



## अल्पवयीन अपहृत मुलीचा घेतला शोध ,अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन बुटीबोरी येथे दिनांक ३०/०१/२०२५ रोजी अप क्र ८५/२०२५ कलम १३७(२) भा.न्या.सं अन्वये दाखल गुन्हयातील अल्पवयीन अपहृत मुलीचा शोध लागत नव्हता. नमुद गुन्हयातील अपहृत मुलगी हीचा शोध घेण्यासाठी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या आदेशाने सदर गुन्हयाचा तपास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांचे कडे वर्ग करण्यात आला. श्री मिलींद तायडे, प्रभारी अधिकारी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात पोउपनि श्री मंगेश वानखेडे,मपोहवा ज्योती वानखेडे, मपोहवा अर्चना कांबळे त्यांनी सदर गुन्हयाचा सखोल तपास केला असता दिनांक १०/११/२०२५ रोजी गोपनिय माहीतीवरून तसेच तांत्रिक पुराव्यावरून नमुद गुन्हयातील अल्पवयीन अपहृत मुलीचा शोध घेवुन तिला बोथली, ता उमरेड, जि. नागपुर येथुन ताब्यात घेतले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास बुटीबोरी पोलीस करीत आहेत.

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कारवाई

**पोलीस स्टेशन जलालखेडा :—** दिनांक १०/११/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध धंदयावर कारवाई करणे कामी पेट्रोलीग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की पोलीस स्टेशन जलालखेडा हद्दीतुन ट्रॅक्टरमध्ये अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जाणार आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी जामगाव शिवारात नाकाबंदी केली असता संशयीत ट्रॅक्टर हे ट्रॉलीसह मिळुन आले. वाहन थांबवुन पाहणी केली असता ट्रॅक्टर ट्रॉली हे नविन आणि विनाक्रमांकाचे असल्याचे दिसले. सदर वाहन चालकाला नाव पत्ता विचारला असता, **गजेंद्र मारोतराव थोटे, वय ४५ वर्षे , रा. भारसिंगी, ता. काटोल जि नागपुर** अशी माहीती प्राप्त झाली त्याला परवान्याबाबत विचारणा केली असता त्याच्या कडे परवाना नव्हता. वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन पोलीसांनी पंचासमक्ष विनाक्रमांकाची

ट्रॅक्टर ट्रॉली मधुन १) २ ब्रास रेती किंमती १०,०००/— रूपये आणि २) विनाक्रमांकाची ट्रॅक्टर ट्रॉली किंमती ५,००,०००/—रूपये असा एकुण **५,१०,०००/—रूपयां**चा मुददेमाल जप्त केला आहे.

**सदर प्रकरणी वाहन नमुद चालक याच्या विरूध्द पोस्टे जलालखेडा येथे कलम ३०३(२), ४९(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७) ४८(८) म.ज म सहीता सहकलम ४.२१. खान खनिज अधिनियम, कलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंध अधि. आणि कलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद रामटेक पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन रामटेक** :— दिनांक ०९/११/२०२५ रोजी रामटेक पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेती ची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी मौजा हीपुंजे पो.स्टे रामटेक येथे नाकाबंदी केली असता लाल रंगाचा ट्रॅक्टर क्र एम एच ४० सी. ए. ४४८९ हा ट्रॉली सह मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असतात्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक क्रिष्णा माधवराव बंधाटे वय २८ वर्ष, रा. चिचाळा ता. रामटेक,याला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. वाहन मालकाचे नाव संजय गोगले,रा. संग्रामपुर ता. रामटेक असे असल्याची माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष १) ट्रॅक्टर क्र एम एच ४० सी. ए. ४४८९ ट्रॉलीसह किमती ५,००,००० /—रूपये व २) १ ब्रास रेती किंमती ७,०००/— रूपये आणि असा एकुण ५,०७,०००/रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

**नमुद वाहन चालक आणि मालक याच्या विरूध्द पोस्टे रामटेक येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चालक अटक करण्यात आली आहे.**

# अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ६ आरोपीतां विरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये,गुन्हे नोंद

दिनांक ०९/११/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूध्द खालील प्रमाणे गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन कन्हान** :— कन्हान पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी नामे रामा बबलु देडे वय २८ वर्षे,रा.बी.१८ इंदीरा कॅम्प कल्याणपुरी ता. तिल्लकपुरी दिल्ली ह.मु. दिपक हातागडे रा.विष्णुनगर कन्हान हा मौजा कन्हान येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन रामटेक :—** रामटेक पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी नामे १) विजय श्रीराम भुते वय ३३ वर्षे,रा.लंबे हनुमान मागे स्वामीविवेकानंद वार्ड रामटेक आणि २) दुर्गेश श्रीराम राउत वय ४१ वर्षे,राधाकृष्ण वार्ड रामटेक हे पंचयती समिती मागे टेकडीवर रामटेक येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन सावनेर** :— सावनेर पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी १) अब्दुल अजिज मोहम्मद ईकब्बाल शहा वय ४७ वर्ष रा. पाण्याच्या टाकी जवळ प्लाट क्र ६०२ गरिब नवाज नगर उप्पलवााडी एसओ नागपुर आणि २) पंजाब सतिराााम धारापुर,वय ५९ वर्षे, रा वार्ड नं ०६ एन के बार चे बाजुला सावनेर हे खापा रोड पुलिया छिंदवाडा सर्विस रोड साावनेर येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन खापा :—** खापा पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी मोहम्मद एजाज मोहम्मद बशीर शेख,वय ४० वर्ष,रा.चांदनी पान सेंटर जवळ घुटकला तलाव चंद्रपुर ता.चंद्रपुर हा मौजा वाकी येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत अंमली पदार्थ सेवन करणाऱ्या एकुण ६ आरोपीतांवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये ६ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

# अवैधरित्या विनापरवाना दारू बाळगुण विक्री, सेंवन तसेच वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ५२ गुन्हे नोंद

दिनांक ०९/११/२०२५ दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू, विदेशी दारू , वाहन तसेच ईतर साहीत्य असा एकुण **३,१०,४८०**/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पोलीस स्टेशन मौदा येथे एकुण २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन कन्हान येथे एकुण २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन बेला येथे एकुण २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन बुटीबोरी येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन सावनेर येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे एकुण ६ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन खापा येथे एकुण २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन उमरेड येथे एकुण ६ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन कुही येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन वेलतुर येथे १ गुन्हा नोंद आहे, पोलीस स्टेशन भिवापुर येथे २ गुन्हे नोंद आहे.पोलीस स्टेशन नरखेड येथे ५ गुन्हे नोंद आह. पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २ गुन्हे नोंद आहे पोलीस स्टेशन काटोल येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे.पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन रामटेक येथे ७ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ५ गुन्हे नोंद आहे पोलीस स्टेशन देवलापार येथे १ गुन्हा नोंद आहे.अशाा एकुण ५२ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ५२ गुन्हे नोंद केले आहे.

**सदर कारवाईत २३,५७० मिली देशी दारू किंमती १०७४०/—रूपये, ३५७ लीटर मोहाफुल दारू किंमती ३३,९०० /— रूपये, ३५२० लिटर सडवा,किंमती १४७,०००/—रूपये, ३६० मिलि विदेशी दारु किंमती ४४०/— रूपये,मोटर सायकल किंमती ९०,०००/—रूपये तसेच ईतर साहीत्य किंमती ३०,४००/— रूपये असा एकुण ३,१०,४८० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नााशवंत मुद्देमाल पंचानामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार तपासले आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक ०९/११/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक १०/११/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्रीमती भाग्यश्री धिरबस्सी उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर उपविभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. पोलीस स्टेशन बोरी अंतर्गत पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले आणि एम.आय. डी.सी. चौक येथे नाकाबंदी केली. पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी बोरी अंतर्गत गंगापुर झोपडपट्टी येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले आणि गार्डन चौक येथे नाकाबंदी केली. नाकाबंदी दरम्यान वाहने तपासण्यात आली. सदर कोबिंग ऑपरेशन श्रीमती भाग्यश्री धिरबस्सी यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. नाकाबंदी दरम्यान संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये स्थानिक पोलीस स्टेशन चे अधिकारी/अंमलदार हजर होते.



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने